महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग, दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ Website - www.msbve.gov.in Email : chairman-msbve@ nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.२०१७-१८/२०१७/१४६५ दिनांक :- २६/०९/२०१७

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, नांदेड

विषय - सत्र २०१७-१८ साठी विद्यार्थी प्रवेश करणेस मुदत वाढविणेबाबत

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.एप्रिल-२०१७/८३४/२०१७ दिनांक १४/०६/२०१७
२. या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.जाने-२०१८/९१४/२०१७ दिनांक २९/०६/२०१७
३. या कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-०४/प्र.का.२०१७-१८/मुदतवाढ/२०१७/१३५५, दि. ०७.०९.२०१७
४. जिव्यशिप्रअ, नांदेड यांचे पत्र क्र. जिव्यशिप्रअ/आस्था/२०१७/८७१, दि. २५.०९.२०१७
५. नांदेड जिल्हयातील संस्थांचे दि. २३.०९.२०१७ रोजीचे पत्र.

आपल्या कार्यालयाच्या वरील संदर्भ क्र. ०४ च्या पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्र. ०१ व ०२ अन्वये सहामाही सत्र परीक्षा जानेवारी - २०१८ करिता दि. १३/०९/२०१७ पर्यंत तसेच एक व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस प्रवेशासाठी दिनांक ३१/०८/२०१७ पर्यंत प्रवेशास मुदत देण्यात आलेली होती. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण संस्था परीषद यांच्या पत्रावर मा. मंत्री महोदय यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार या कार्यालयाच्या वरील संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये सहामाही, एक व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांना दि. २९.०९.२०१७ पर्यंत विद्यार्थी प्रवेश करणेस मुदत देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी आपल्या कार्यालयाने तसेच आपल्या जिल्हयातील संस्थांनी २०१७-१८ साठी नुतनीकरण मान्यता उशीराने मिळाल्याने विद्यार्थी प्रवेश करणे आणखी मुदतवाढ मागितलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, नांदेड जिल्हयातील संस्थांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बीड यांना सदर संस्थांचे निरीक्षण करणेस कळविण्यात आलेले होते. सदर निरीक्षणास स्थगिती दिल्यानंतर त्वरीत सदर नुतनीकरण प्रस्ताव सादर करणेबाबत आपणांस कळविण्यात आलेले होते.

आपल्या जिल्हयातील संस्थांनी निरीक्षणास असहकार दर्शविल्यामुळे त्यांना निरीक्षणाचे अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

विद्यार्थी प्रवेश करणेसाठी यापूर्वीच एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णयानुसार संस्थेत राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमांस प्रवेशीत विद्यार्थ्यांचे ६ महिने, १ वर्ष, व २ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांसाठी अनुक्रमे किमान १२० दिवस, २०० दिवस, आणि ४०० दिवस प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. आणखी मुदतवाढ दिल्यास अभ्यासक्रम विहित वेळेत पूर्ण होणे शक्य होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण व्यवस्थित पूर्ण होणार नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे वरील बाबी लक्षात घेता मंडळाने यापूर्वीच विद्यार्थी प्रवेशास पुरेशी मुदतवाढ दिलेली असल्याने यापुढे विद्यार्थी प्रवेशास मुदतवाढ देणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सदर बाब आपल्या स्तरावरून आपल्या अधिपत्याखातील सर्व संबधित संस्थांना कळविण्यात यावी.

(डी.ए. दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
२) जिव्यशिप्रअ कार्यालय, (सर्व) यांना माहितीसाठी
३) संगणक विभाग यांना मंडळाच्या वेबसाईटवर टाकणेसाठी.
४) सर्व संबधित संस्था.